# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## दसरा व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर मेट्रोने केली १,५०,५९९ प्रवाशांच्या ऐतिहासिक प्रवासाची नोंद




नागपूर: दसरा व धम्मचक्र प्रवर्तन दिन या पवित्र दिवसानिमित्त नागपूर मेट्रोमध्ये प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, एका दिवसात १,५०,५९९ प्रवाशांनी मेट्रोसेवा वापरली.या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेता नागपूर मेट्रोने आपल्या सेवा २ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ५:०० वाजेपासून रात्री १२:०० वाजेपर्यंत सुरू ठेवल्या. शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी येणाऱ्या नागरिकांची व भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून सेवा वाढवण्यात आल्या.

प्रवाशांचा उदंड प्रतिसाद पाहता नागपूर मेट्रोवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसून येते. प्रवासाच्या सुरक्षितता, वेगवान सेवा आणि आरामदायक प्रवासासाठी नागरिक मेट्रोचा अधिकाधिक वापर करत आहेत. "नागरिक आता आपल्या सोयीसाठी आणि आरामदायक प्रवासासाठी मेट्रोसेवेचा वापर करत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळालेला प्रतिसाद हा

नागपूर मेट्रोच्या यशाचे प्रतीक आहे व शहराच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.

ही कामगिरी नागपूर मेट्रोच्या शाश्वत आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना बळकटी देणारी आहे. यामुळे रस्त्यावरील वाहतूक कमी होण्यास मदत होते व सणासुदीच्या काळात नागरिकांना एक विश्वासार्ह पर्याय उपलब्ध होतो.नागपूर मेट्रो आपल्या प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सेवा देण्यास सदैव कटिबद्ध आहे आणि भविष्यातही प्रवाशांच्या सोयीसाठी नवनवीन सुविधा उपलब्ध करून देत राहणार आहे.